MHRT060000902019

संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्रमांक ४८/२०१९
राजेश - विरुध्द - विश्वनाथ

## निशाणी १२ खाली पारित आदेश

(पारित दिनांक ०१/०८/२०२२)

१. निशाणी ०१ वरील फिर्यादीमध्ये दुरुस्ती करण्यासाठी सदरचा अर्ज फिर्यादीने दाखल केलेला आहे.

२. फिर्यादीचे असे म्हणणे आहे की, सदरची फिर्याद ही आरोपी विरुध्द परक्राम्य दस्तऐवज अधिनियमचे कलम १३८ अन्वये आरोपाच्या अपराधासाठी दाखल करण्यात आलेले आहे. प्रस्तुत फिर्यादीमध्ये पॅरा नंबर ३ मधील सहाव्या ओळीमध्ये '' दिनांक ६/८/२०१६ रोजी रुपये ३,००,०००/– (रुपये तीन लाख मात्र) घेतलेले होते व आहेत '' असे नमूद केलेले आहे. सदर तथ्यकथनामध्ये दिनांक ६/८/२०१६ या तारखेमधील २०१६ हे साल अनावधनाने लिहीण्यात आले असून त्याऐवजी २०१८ असे नमूद करणे आवश्यक आहे व त्याअनुषंगाने फिर्यादी निशाणी ०१ वरील फिर्यादमध्ये दुरुस्ती करुन मागत आहे. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार अशी दुरुस्ती केल्यामुळे फिर्यादीच्या स्वरुपात काही बदल होणार नाही. फिर्यादीचे असेही म्हणणे आहे की, सदरची दुरुस्ती मंजूर न झाल्यास फिर्यादीस न्यायापासून वंचित रहावे लागेल व त्याचे अतोनात नुकसान होईल.

३. आरोपीने निशाणी १२ वरील दुरुस्ती अर्जावर त्याचे निशाणी २१ खाली म्हणणे सादर केलेले आहे. आरोपीने अर्जास विरोध करताना असे म्हणणे मांडले आहे की, फिर्यादीने यापूर्वीच आरोपीविरुध्द संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्रमांक ४३९/२०१८ अशी १० लाखाच्या

धनादेश अनादराची केस दाखल केली आहे. सदरहू केसमध्ये देखील दिनांक ६/८/२०१६ रोजी रक्कम रुपये तीन लाख मात्र आरोपीने फिर्यादीकडून घेतले असा उल्लेख करणेत आलेला आहे व त्या धनादेश अनादराचे प्रकरणात फिर्यादीचा सरतपास व उलटतपास पूर्ण झाला आहे. त्यामध्ये फिर्यादीने सदरची रक्कम रुपये तीन लाख मात्र ही दिनांक ६/८/२०१६ रोजी आरोपीने घेतली असल्याचे कबूल केले आहे. फिर्यादीने त्यावेळी सन २०१६ ऐवजी सन २०१८ असे कोठेही सांगितलेले नाही. याचाच अर्थ फिर्यादीने संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्रमांक ४३९/२०१८ च्या कामी त्याच्या उलटतपासामध्ये रक्कम रुपये ३,००,०००/- दिनांक ६/८/२०१६ रोजी आरोपीने घेतले होते याबाबत अॅडमिशन्स दिल्यानंतर आता फिर्यादीने या केसच्या कामी हा दुरुस्ती अर्ज देवून सन २०१६ च्या ऐवजी सन २०१८ अशी दुरुस्ती मागितली आहे. आरोपीचे असेही म्हणणे आहे की, संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्रमांक ४३९/२०१८ मध्ये फिर्यादीने फिर्यादीचा जो पुरावा आला आहे तो आता दुरुस्ती अर्ज देवून बदलयाचा प्रयत्न फिर्यादी करु पहात आहे. फिर्यादीने दिलेला सदरचा अर्ज हा चुकीचा व आफ्टर थॉट आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विंनती खुलाशामध्ये करण्यात आली आहे.

४. फिर्यादीपक्षातर्फे विद्वान वकील श्री. पिल्ले यांचा युक्तिवाद ऐकला. आरोपीतर्फे युक्तिवाद करण्यासाठी त्याचे विधिज्ञ गैरहजर राहीले आहेत.

५. फिर्यादीपक्षातर्फे विद्वान वकील श्री. पिल्ले यांनी श्री. दिगंबर गणपत कोरडे विरुध्द विनायक आनंदराव गावंडे व इतर, 2011(0) All MR (Cri.) 1603 या माननिय मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठच्या निकाल पत्रावर भिस्त ठेवली आहे. सदर प्रकरणात परक्राम्य दस्तेवज अधिनियमचे कलम १३८ अन्वयेच्या फिर्यादीमध्ये करण्यात आलेली दुरुस्ती ही योग्य असल्याचे माननिय मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ यांनी म्हटले आहे.

६. सदर प्रकरणात धनादेश अनादरीत झाल्यानंतर फिर्यादीने आरोपीला जो नोटीस पाठविला आहे त्यात दिनांक ६/८/२०१६ ऐवजी ६/८/२०१८ अशी तारीखच नमूद असल्याचे दिसून येते. त्यामुळे निशाणी १ मधील फिर्यादमध्ये "२०१६" असे चुकीचे अनावधानाने नमूद झाले असल्याचे दिसून येते.या प्रकरणात अद्याप पर्यंत पुराव्याचे शपथपत्र दाखल झालेले नाही. आरोपी सांगत असल्याप्रमाणे आधीच्या दुस–या धनादेश अनादर झाल्याच्या प्रकरणात फिर्यादीने काय सांगितले त्याबाबत या प्रकरणात विसंगती बचावाच्या स्वरुपात आणण्याची मुभा उलटतपासा दरम्यान आरोपी पक्षास आहे. दिगंबर विरुध्द विनायक या निकालपत्रातील न्यायतत्व विचारात घेवून तांत्रीक दोष दुर करण्यासाठी फिर्यादमध्ये दुरुस्ती करण्यास मुभा देणे न्यायोचित होईल. करीता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्ज मंजूर झाल्याच्या ७ दिवसांच्या आत फिर्यादमध्ये दुरुस्ती करण्याचे निर्देश फिर्यादी पक्षास देणेत येते.

सही/–

दापोली

दिनांक : ०१/०८/२०२२.

(आनंद याज्ञवल्क्य बोरकर)

न्यायदंडाधिकारी वर्ग १, दापोली.

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : R.K.Sangare. |
| Court | : Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Dapoli. |
| Date of order. | : 01/08/2022 |
| Order signed by the Presiding Officer on. | : 01/08/2022 |
| Order uploaded on. | : 01/08/2022 |